**निशाणी क्र. २१**

(साक्षीदार हा दहा वर्ष वय असलेला अज्ञान मुलगा असल्याने त्याची साक्ष अभियोग पक्ष आणि आरोपींचे वकील यांच्या संमतीने बंद कक्षामध्ये घेण्यात येत आहे. आरोपीस बुलढाणा येथील जेलमधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या सहाय्याने हजर करण्यात आले असून त्यांना या प्रकरणातील सुनावणीचे दृश्य दिसत आहे आणि श्रवण होत आहे याची खात्री करून घेण्यात आली. साक्षीदार हा प्रश्नांची उत्तरे समर्पक देण्यास समर्थ आहे की कसे यासंदर्भात काही प्रश्नांची विचारणा करण्यात येत आहे.)

प्रश्न क्र. **१.** तुझे नाव काय आहे?

**उत्तर** सार्थक विष्णू खैरे.

प्रश्न क्र. **२.** तुझी जन्मतारीख तुला सांगता येईल का?

**उत्तर** ०५/११/२०१४ माझी जन्मतारीख आहे.

प्रश्न क्र. **३.** तुला किती बहिण भाऊ आहेत?

**उत्तर** दोन भाऊ आणि एक बहीण आहे.

प्रश्न क्र. **४.** तू कितव्या इयत्तेत शिकतो?

**उत्तर** मी चौथा इयत्तेत शिकतो.

प्रश्न क्र. **५.** कोणता विषय तुला आवडतो ?

**उत्तर** मला परिसर अभ्यास २ आवडतो.

प्रश्न क्र. **६.** तो विषय का आवडतो?

**उत्तर** त्यामध्ये शिवाजी महाराजांचा इतिहास आहे आणि दुसऱ्यांची मदत करायला तो विषय शिकवतो.

(साक्षीदाराचे सामान्य ज्ञान चांगले असून प्रत्येक प्रश्नांची उत्तरे व्यावहारिक आणि प्रश्नांची समर्पक अशी देत असल्याने तो मानसिकरित्या साक्ष देण्यास सक्षम आहे या निष्कर्षापर्यंत पोहोचता येते त्यामुळे साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे)

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ (PW– 2) यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – सार्थक विष्णू खैरे.

वय – १० वर्षे, व्यवसाय – शिक्षण

राहणार – शरद कॉलेज महाविद्यालय, चिखली रोड, बुलढाणा.

– – – – –

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी शासकीय अभियोक्ता श्री.वि.मा. बापट यांच्यामार्फत</u>**

प्रश्न क्र. **१.** कोर्टात आल्यावर कसे बोलावे लागते?

**उत्तर:–** कोर्टात आल्यावर खरे सांगावे लागते.

प्रश्न क्र. **२.** खोटे सांगितले तर काय होते?

**उत्तर:–** देव शाप देतो.

प्रश्न क्र. **३.** बुलढाणा येथे राहण्या अगोदर तू कोठे राहत होता?

**उत्तर:–** मी नारायणपूर तालुका नांदुरा येथे राहत होतो.

प्रश्न क्र. **४.** त्या ठिकाणी तुझ्या घरी कोण कोण राहत होते?

**उत्तर:–** मी, माझे दोन भाऊ, एक बहीण, आई वडील आणि आजोबा राहत होते.

प्रश्न क्र. **५.** तुझ्या आईचे आणि वडिलांचे नाव काय होते?

**उत्तर:–** माझ्या आईचे नाव वर्षा होते आणि वडिलांचे नाव विष्णू आहे.

**(जेलमधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कनेक्टिव्हिटी बंद झाली असल्याने सरतपास स्थगित करण्यात आला)**

प्रश्न क्र. **६.** तुझ्या आईचे काय झाले?

उत्तर:– ती वारली.

प्रश्न क्र. **७.** कशाने वारली.

उत्तर:– वडिलांनी मारले.

प्रश्न क्र. **८.** तू त्यावेळी किती वर्षाचा होता?

उत्तर:– आठवत नाही.

प्रश्न क्र. **९.** त्यावेळी तू शाळेत जात होता का?

उत्तर:– होय. बालवाडीत जात होतो.

प्रश्न क्र. **१०.** काय झाले होते त्या दिवशी?

उत्तर:– पप्पांनी दारू पिऊन आले होते. ते चिकन घेऊन आले होते. ते आंबे पण घेऊन आले होते. त्यांनी आईला मारायला सुरुवात केली. आईला ते मारत होते मारत होते आणि साडेबारा वाजता ते पाच वाजेपर्यंत ते आईला मारत होते. आईला त्यांनी कु–हाडीने पट्ट्याने आणि वायरने मारले होते.

प्रश्न क्र. **११.** तुझ्या आईला कुठे कुठे लागले होते?

उत्तर:– तिच्या डोक्याला चीर पडली होती. हाताला लागले होते. ओठ पडले होते. तिचे डोळे सुजले होते. आईने दरवाजा बंद केला होता. माझे पप्पा त्या दरवाजाला कु–हाडीने मारत होते. शेजारची बाई आली होती भांडण सोडवायला. माझ्या वडिलांनी त्या बाईच्या पोटात लाथ मारली. आबा वाचवायला गेले होते.

प्रश्न क्र. **१२.** आबा म्हणजे कोण?

उत्तर:– माझे आजोबा.

प्रश्न क्र. **१३.** मग काय झालं ?

उत्तर:– आबा वाचवायला गेले होते. आम्ही आबाच्या मागे गेलो होतो. माझी बहीण पाळण्यात होती. माझे पप्पा आईला मारत होते. पाळण्याची दोरी माझ्या बहिणीच्या गळ्याला अटकली होती. माझे आजोबा माझ्या बहिणीला वाचवायला गेले होते. माझ्या आजोबांनी माझ्या बहिणीला बाहेर आणले. माझ्या मोठ्या भावाला माझ्या वडिलांनी कॉलर धरून लोटले. माझ्या भावाच्या डोक्याला दरवाज्याची कडी लागता लागता माझ्या आजोबांनी त्याला वाचवले. माझ्या आईला पप्पांनी पट्ट्याने हाणले, चापटा बुक्क्यांनी हाणले. माझ्या आईला पप्पा मारत होते तेव्हा पप्पांनी आईला खाली आपटले तेव्हा पलंगाचे आणिदार (टोकदार) आईच्या डोक्याला लागले. आईच्या डोक्यातून रक्त निघत होते. आम्ही आईला वाचवायला गेलो तर पप्पांनी आम्हाला शिव्या दिल्या होत्या.

प्रश्न क्र. **१४.** तुला कुऱ्हाड आणि पलंग दाखविला तर ओळखता येईल का?

उत्तर:– होय.

प्रश्न क्र. **१५.** तुझी आई कोणते कपडे घालत असे?

उत्तर:– साडी, परकर आणि ब्लाऊज.

प्रश्न क्र. **१६.** ते कपडे दाखविले तर तू ओळखशील का?

उत्तर:– होय. रक्ताने पण ते भरले होते.

प्रश्न क्र. **१७.** पलंगाचा ठावा जो तुझ्या आईला लागला होता तो तुला दाखविल्यास ओळखू शकतो का?

उत्तर:– होय.

प्रश्न क्र. **१८.** घटनेच्या दिवशी तुझ्या बाबांनी घातलेले कपडे ओळखशील का?

उत्तर:– होय. हाफ शर्ट होते असे वाटते. खाली जीन पॅन्ट घातली होती.

(साक्षीदारासमोर सर्व मुद्देमाल सीलबंद अवस्थेत होता तो उघडण्यात आला. साक्षीदाराने पलंगाचा लोखंडी ठावा ओळखला. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक १** देण्यात आले. साक्षीदार आणि लाकडी दांडा ओळखला. **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक २** देण्यात आले. साक्षीदाराने मयत महिलेची साडी ओळखली. ती **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ३** वर आहे. साक्षीदाराने पेटिकोट ओळखला. तो **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ४** वर आहे. साक्षीदाराने ब्लाउजही ओळखले. ते **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ५** वर आहे. साक्षीदाराने एका शर्ट कडे निर्देश करून सांगितले की ते शर्ट त्याचे आहे. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ६** देण्यात आला. साक्षीदाराकडे चौकडीचा हाफ बाहेरच्या दुसऱ्या एका शर्ट कडे निर्देश केला आणि सांगितले की तो त्याच्या वडिलांचा होता. तो **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ७** वर आहे. एका राखाडी रंगाच्या जीन्स पॅन्ट कडे साक्षीदार ने बोट दाखवून ती त्याच्या वडिलांची आहे असे सांगितले. ती **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ८** वर आहे. दुसऱ्या एका जीन्स पॅन्ट कडे निर्देश करून साक्षीदार सांगत आहे की ती पॅन्ट त्याची आहे. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ९** देण्यात आले. साक्षीदाराने एका टी–शर्ट कडे निर्देश करून सांगितलं की त्या दिवशी त्याच्या पप्पांनी तो टी–शर्ट शर्टच्या आत घातला होता. तो टी–शर्ट **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक १०** वर आहे. मुद्देमालात एकूण ८ आठ काड्या असून त्याकडे साक्षीदार निर्देश करून सांगतो की त्यानेही आईला मारले होते. त्यास एकत्रीतपणे **मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक ११** देण्यात आले.)

(आरोपीतर्फे हरकत घेण्यात आली की सदर मुद्देमाल हा या साक्षीदाराकडून अथवा त्याच्यासमक्ष जप्त केला नसल्याने तो पुराव्यात सामील करून घेता येणार नाही. परंतु हा साक्षीदार प्रत्यक्षदर्शी असल्याने त्यास सदर मुद्देमाल दाखविणे आवश्यक असल्याने तो मुद्देमाल त्याला दाखविण्यात आला.)

**सरतपास पूर्ण.**

## उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत

प्रश्न क्र. **१९.** तुझे मामा कुठे असतात?

उत्तर:– पळशी सुपो येथे असतात.

प्रश्न क्र. **२०.** तुझी छोटी बहीण मामाकडे असते का?

उत्तर:– हो.

प्रश्न क्र. **२१.** आत्तापर्यंत बुलढाण्याहून तू मामाकडे किती वेळा गेलास?

उत्तर:– एकदा गेलो होतो. दिवाळीच्या सुट्टीत गेलो होतो. उन्हाळ्याच्या सुट्टीत आता जाईन.

प्रश्न क्र. **२२.** त्यावेळी मामाकडे किती दिवस थांबला होता?

उत्तर:– सहा दिवस सुट्टी काढली होती.

प्रश्न क्र. **२३.** बुलढाण्याहून आज येताना तुझ्यासोबत कोण होते?

उत्तर:– माझा भाऊ आणि काळजीवाहक आहेत.

प्रश्न क्र. **२४.** कोर्टात आल्यानंतर येथील पोलीस काकांनी तुम्हाला वाचून दाखविले आणि काय सांगायचे ते सांगितले हे बरोबर आहे का?

उत्तर:– त्यांनी सांगितले की कोर्टाने विचारले तर खरं खरं काय ते सांगायचे.

प्रश्न क्र. **२५.** त्यांनी तुम्हाला सांगितलं की घटना तुमच्या डोळ्यासमोर घडली असे सांगायचे?

उत्तर:– तसे नाही सांगितले. त्यांनी सांगितलं की तुमच्या डोळ्यासमोर जे घडले ते खरे खरे सांगायचे.

प्रश्न क्र. **२६.** ज्यावेळी तुझी आई मरण पावली त्यावेळी तुझे वडील शेतात होते?

उत्तर:– नाही. आम्ही सेंट्रल जेलला वडिलांना भेटायला गेलो होतो तेव्हा ते सांगत होते की ते पाणीपुरी खायला गेले होते. कधी कधी

सांगायचे की ते फिरायला गेले होते. आईला कोणी मारले ते माहीत नाही असे ते आम्हाला सांगायचे.

प्रश्न क्र. **२७.** आता जे तू सांगितले ते तुला पोलीस काकांनी सांगायला सांगितले?

उत्तरः– नाही. मी सेंट्रल जेलला पप्पांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी सांगितले की आई स्टूलवर उभी राहून जाळ्या लावत होती तेव्हा आईचा पाय घसरला आणि ती खाली पडली असे सांगायचे.

प्रश्न क्र. **२८.** तुम्ही जर काही चुकीचे केले तर तुमचे वडील तुम्हाला रागवायचे?

उत्तरः– नाही. त्यांच्या मनासारखे नाही केले तर ते आईला आणि आम्हालाही मारायचे. आम्हाला ते फेकून द्यायचे.

प्रश्न क्र. **२९.** ते रागवायचे म्हणून आजही वडीला बद्दल तुझ्या मनात राग आहे?

उत्तरः– नाही.

प्रश्न क्र. **३०.** जेव्हा तू तुझ्या मामाकडे गेला तेव्हा तुला मामाने सांगितले की घटना अशी अशी घडली हे सांगायचे?

उत्तरः– नाही.

प्रश्न क्र. **३१.** मामा व्यतिरिक्त जे जे तुम्हाला बुलढाण्याला भेटायला येतात त्यांनीही तुम्हाला असे सांगितले की वडिलांच्या विरुद्ध बोलायचे?

उत्तरः– नाही.

प्रश्न क्र. **३२.** वडील दारू पिऊन आले होते व चिकन आणि आंबे घेऊन आले होते हे तू पोलिसांना सांगितले होते का?

उत्तरः– होय.

प्रश्न क्र. **३३.** बारा वाजल्यापासून पाच साडेपाच वाजेपर्यंत वडील आईला मारत होते हे तू पोलिसांना सांगितले होते का?

उत्तरः– होय. सांगितले होते.

प्रश्न क्र. **३४.** कुराडीने, वायरणे मारले आणि कुऱ्हाडीने दरवाजांवर मारले असे तो पोलिसांना सांगितले होते का?

उत्तरः– सांगितले होते.

प्रश्न क्र. **३५.** शेजारची बाई आली होती आणि तिच्या पोटात लाथ मारली असे पोलिसांना सांगितले होते का?

उत्तरः– सांगितले होते.

प्रश्न क्र. **३६.** आईला वाचवायला गेलो तेव्हा वडिलांनी शिव्या दिल्या असे पोलिसांना तू सांगितले होते का?

उत्तरः– सांगितले होते.

प्रश्न क्र. **३७.** आईच्या हाताला लागले, डोक्याला चीर पडली आणि ओठ हिरवे पडले असे तो पोलिसांना सांगितले होते का?

उत्तरः– सांगितलं होतं.

प्रश्न क्र. **३८.** तुझ्या आईला दुसऱ्यानेच कोणीतरी मारले?

उत्तरः– ते खोटे आहे.

प्रश्न क्र. **३९.** तुला दाखवण्यात आलेल्या मुद्देमाल वस्तू या तुझ्यासमोर जप्त करण्यात आल्या नाहीत?

उत्तरः– ते खरे आहे.

प्रश्न क्र. **४०.** त्या वस्तू तुझ्या ओळखीच्याही नाहीत?

उत्तरः– त्या माझ्या ओळखीच्या आहेत.

प्रश्न क्र. **४१.** जेव्हा तुझी आई वारली तेव्हा तुझे वडील शेतात गेलेले होते हे खरे आहे का?

उत्तरः– ते खोटे आहे.

प्रश्न क्र. **४२.** तुझ्या आईच्या मृत्यूमध्ये तुझ्या वडिलांचा हात नाही?

उत्तरः– त्यांचा हात आहे.

प्रश्न क्र. **४३.** तुझ्या मनात तुझ्या बाबांबद्दल राग आहे आणि त्यामुळे तुझे मामा योगेश पळशी सुपो त्यांच्या सांगण्यावरून आणि पोलीस काकांच्या सांगण्यावरून तू आज खोटे सांगत आहे?

उत्तरः– नाही.

प्रश्न क्र. **४४.** तू खोटी साक्ष देत आहे?

उत्तरः– नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास – काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 17:37:10 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०३/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत १३.४५ वाजता सुरु करुन १४.४५ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.03.01 17:37:15 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०३/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |